| MHND190007152021 | दाखल ता. | : | १७/०६/२०२१ |
|---|---|---|---|
| | नोंदणी ता. | : | १७/०६/२०२१ |
| | निकाल ता. | : | ०५/०६/२०२६ |
| | कालावधी | | : ०४ व. ११ म. १९ दि. |

**लोहा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, ता.लोहा जि.नांदेड यांचे न्यायालयात (कोर्ट नं.०२)**

समोर : पिठासन अधिकारी
**श्री. निरंजन बा. चव्हाण**
न्यायनिर्णय घोषित दिनांक ०५ जुन, २०२६
**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२१३/२०२१**
नियमित खटल्याप्रमाणे चालविण्यात आला
निशाणी क्र.४४

गुन्हा नोंदणी क्रमांक ३५/२०२१

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासनतर्फे पोलीस निरीक्षक, माळाकोळी पोलीस ठाणे |
| प्रतिनिधित्व | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री मनिषा जे. गायकवाड |
| आरोपी | | **१. दशरथ भाऊसाहेब सुरनर,**<br>वय : २९ वर्ष, धंदा : ड्रायवर,<br>रा.बनवस ता.पालम जि.परभणी |
| प्रतिनिधित्व | | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. बी.एम.गोरे |

**दोषारोप : भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३०४ (अ), तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४/१७७ प्रमाणे.**

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | १६/०२/२०२१ |
| पहिली खबर दिलेली तारीख | १७/०२/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १७/०६/२०२१ |
| दोषारोप ठेवलेला दिनांक | १२/०७/२०२२ |
| पुरावा सुरु तारीख | ०३/०८/२०२२ |
| निकाल राखून ठेवलेली तारीख | निरंक |
| निकाल दिलेली तारीख | **०५/०६/२०२६** |

| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |
|---|---|

| अ. क्र. | आरोपींचे नावे | आरोपींना अटक केलेला दिनांक | आरोपींना जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोपींवर ठेवलेले गुन्हे | आरोपींना निर्दोष अथवा शिक्षा | आरोपींना देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वयेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **दशरथ भाऊसाहेब सुरनर** | सी.आर.पी.सी., चे कलम ४१ (अ) (१) प्रमाणे नोटीस दिली. | १७.०२.२०२१ | भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४ अ तसेच २७९, ३०४ अ, तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४/१७७ प्रमाणे | **निर्दोष मुक्त करण्यात आले.** | निरंक | निरंक |

## अ. अभियोगपक्षाचे साक्षीदार :

| क्रमांक | निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र-१ | १५ | संभाजी पि. गंगाराम कांबळे | फिर्यादी |
| अ.सा.क्र-२ | १७ | मुरलीधर मल्हारी सुरनर | साक्षीदार |
| अ.सा.क्र-३ | २० | प्रभाकर पि. शिवाजी गोकुंडे | घटणास्थळ पंच |
| अ.सा.क्र-४ | २६ | वर्षा भ्र. राजेश श्रीरामे | साक्षीदार |

## ब. आरोपीचे बचावाचे साक्षीदार :

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| ब. साक्षीदार क्र-१ | -- | -- |

## क. न्यायालयीन साक्षीदार :

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| क. साक्षीदार क्र-१ | -- | -- |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेल्या कागदपत्रांची यादी :

| **अ.क्र.** | **निशाणी** | **तपशील** | **कोणाकडून सिध्द करण्यात आले** |
|---|---|---|---|
| १. | १६ | फिर्याद | फिर्यादी (सा.क्र.१) |
| २. | २१ | घटणास्थळ पंचनामा | साक्षीदार क्र.३ |

<u>मुद्देमाल</u>

| मुद्देमाल | तपशील | **कोणाकडून सिध्द करण्यात आले** |
|---|---|---|
| -- | --- | --- |

## <u>न्यायनिर्णय</u>
**(<u>घोषित तारीख : ०५/०६/२०२६</u>)**

आरोपींविरुध्द ठेवलेल्या भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३०४(अ) तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४/१७७ नुसार दोषारोप सिध्द करण्यासाठी प्रस्तुत संपरिक्षा आहे.

**<u>सरकार पक्षाचे थोडक्यात कथन की,</u>**

**०२.** दिनांक १६.०२.२०२१ रोजी फिर्यादी संभाजी कांबळे मयत मल्हारी सुरनर हे सायंकाळी ०६.०० वाजता खडी मशीनकडे जात होते. त्यावेळी पाठीमागुन येणारा कंटेनर गाडी क्र. एम.एच १२ एन.एक्स ३३५० याने मल्हारी यास मागुन जोरात धडक दिली. धडक मारल्यामुळे ते खाली पडले. त्यामुळे त्याला डोक्याला व शरीरावर जागोजागी मार लागला. फिर्यादीने कंटेनर थांबविण्याचा प्रयत्न केला असता ते थांबले नाही. त्यानंतर त्यांनी मयताच्या नातेवाईकांना फोन केला व मयतास दवाखान्यात नेले. त्यानंतर फिर्यादीने (नि.क्र.१६) प्रमाणे आरोपींविरुध्द पोलिस ठाणे माळाकोळी, ता. लोहा, जि. नांदेड येथे फिर्याद नोंदवली.

**०३.** सदरहू फिर्यादीवरून आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३०४(अ) तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४/१७७ नुसार गुन्हा क्र.३५/२०२१ नोंदविण्यात आला. त्याप्रमाणे तपास अधिकारी यांनी घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा तयार केला. जप्ती पंचनामा तयार केला साक्षीदारांचे बयाण नोंदविले. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले.

**<u>दोषारोप व आरोपींचे म्हणणे</u> –**

**०४.** दोषारोपपत्र व दस्ताऐवजांचे अवलोकन करुन आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३०४(अ) तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४/१७७ नुसार आरोप (निशाणी क्र.९ प्रमाणे) निश्चित करुन आरोपींना वाचून दाखविले. आरोपीचे (निशाणी क्र.१० प्रमाणे) आरोप नाकबूल केले.

आरोपींविरुद्ध गुन्हादर्शक पुरावा मिळून आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ख) प्रमाणे निवेदन नि.क्र.४० प्रमाणे नोंदविण्यात आले.

## विचाराधीन प्रश्न व निष्कर्ष –

**०५.** सहा. सरकारी वकील श्री मनिषा जे गायकवाड व आरोपींतर्फे वकील श्री.बी.एम.गोरे यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्याचे न्यायीक निकालासाठी उद्भभलेले विचारधीन प्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १६.०२.२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता माळेगाव येथून बनवस रोडने खडी मशीनकडे जात होते. त्यावेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटेनर क्र.एम.एच.१२–एन.एक्स.३३५०हे हयगयीने अगर निष्काळजीपणाने चालवून मयत मल्हारी सुरनर याला पाठीमागुन जोरात धडक देवून त्याच्या मृत्यूस कारणीभुत झाला आणि त्याद्वारे **भा.दं.सं. चे कलम ३०४–अ अन्वये** गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी.. |
| २. | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने जेणे करून मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुःखापत अगर शती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर वरील कंटेनर चालविल्याचे व त्याद्वारे भा.दं.सं. चे कलम २७९ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | . नकारार्थी.. |
| ३. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या | नकारार्थी.. |

| | | |
|---|---|---|
| | ताब्यातील वाहनाने मयत मल्हारी सुरनर याला धडक दिली व त्यानंतर तो घटणास्थळी न थांबता तसेच जवळच्या पोलीस स्टेशनला सुचित न करता तेथून निघुन गेला आणि  आणि त्याद्वारे त्यांनी मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४/१७७ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशान्वये आरोपीला निर्दोष मुक्त केले.** |

## युक्तीवाद

**०६.** सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादी यांनी कंटेनरने जोरात येवून मयत मल्हारी सुरनर याच्या पाठीमागुन येवून धडक दिली असे पुराव्यात कथन केले आहे. कंटेनर चालकाने निष्काळजीपणे व हयगयीने वाहन चालविल्याने मयताच्या मृत्यूस कारणीभूत झाले. इतर साक्षीदारांनी सुध्दा फिर्यादीस सहाय्य केले आहे. तसेच घटणास्थळ पंचनामा सुध्दा सिध्द झाला आहे. एकंदरीतच आरोपीने गुन्हा केल्याचे सरकारी पक्षाने वाजवी साक्षंकतेच्या पलीकडे जावून सिध्द केलेले आहे. त्यामुळे आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा करावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०७.** आरोपींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की घटणेच्या ठिकाणी खडीची धुळ असल्यामुळे आजूबाजूला दिसत नाही असे फिर्यादीने उलटतपासात मान्य केले आहे. आरोपीने मल्हारी यास धडक दिली नाही तसेच निष्काळजीपणे व हयगयीने वाहन चालविले नाही. तपास अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांना सरकारी पक्षातर्फे पुरेशी संधी देवुन सुध्दा तपासण्यात आले नाही. तसेच सरकारी पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा हा वाजवी साक्षंकतेच्या पलीकडे जावुन सिध्द केलेला नाही. त्यामुळे आरोपीला निर्दोष सोडावे अशी त्यांनी विनंती केली.

## कारणमिमांसा
## विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ३ करीता –

०८. प्रस्तुत विचाराधीन प्रश्न क्र.०१ ते ०३ हे परस्परांशी संबंधित असल्याने त्यांची कारणमिमांसा ही एकत्रित केली आहे. आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षास हे सिध्द करणे आवश्यक आहे की, घटनेच्या दिवशी आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटेनर हे निष्काळजीपणे व हयगयीने चालवले त्यामुळे मल्हारी सुरनर हा मयत झाला. हे सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षा तर्फे एकुण चार साक्षीदार तपासण्यात आले आहे.

०९. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात कथन केले की, घटणेच्या दिवशी ते व त्याच्या सोबत मयत मल्हारी हे रस्त्याच्या बाजुने जात असतांना मागुन येणाऱ्या कंटेनर मयत मल्हारी यास धडक दिली. त्यामुळे तो खाली पडला व त्याच्यामुळे त्याच्या डोक्याला व शरीराला मार लागला. घटणास्थळाची पाहणी केली असता त्या ठिकाणी घटणास्थजवळ चौक असल्याचे निदर्शनास येते. तसेच Res ipsa loquitur या तत्वानुसार अपघात हा एखाद्याच्या हयगयीपणामुळे होऊ शकतो. तसेच घटणास्थळावरील परिस्थिती ही स्वत: घटणेबाबत सांगत असते. या ठिकाणी वाहण चालक याने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने चालविले का किंवा वाहन चालवितांना जी काळजी घ्यायला पाहिजे होती ती घेतली होती का ? वर उल्लेख केल्याप्रमाणे फिर्यादी हे एकमेव प्रत्यक्ष दर्शी साक्षीदार आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, सदरच्या कंटेनरने जोरात येवून मयताच्या पाठीमागुन धडक दिली. परंतु, घटणेच्या जवळ चौक असल्याचे घटणास्थळ पंचनाम्याच्या नकाशावरुन दिसून येते. तसेच चौकामध्ये एखाद्या वाहनाला वळण घेवून यायचे असल्यास त्याचा निश्चितच वेग कमी होतो. सरकार पक्षाच्या कथनानुसार अपघात हा कंटेनरमुळे झाला आहे. सदरच्या कंटेनरचा आकार हा निश्चित इतर वाहनापेक्षा मोठा आहे. त्यामुळे सदरच्या कंटेनरला वळण घ्यावयाचे असल्यास निश्चितच त्याचा वेग कमी होतो. तसेच रस्त्या हा महामार्ग आहे. त्यामुळे वेग हा निष्काळजीपणे होऊ शकत नाही.

तसेच कंटेनर निश्चित वेग किती होता या संदर्भात ठोस पुरावा न्यायालयासमक्ष आला नाही. तसेच घटणास्थळ (नि.क्र.२१) ची पाहणी केली असता त्यामध्ये रस्त्यावर चाकाच्या खुणा असल्याचे नमुद नाही. दुसरी महत्वाची बाब म्हणजे रस्ता नियम कायद्यानुसार पदचाऱ्याने रस्त्याच्या उजव्या वाजुला चालावे असे आहे. परंतु, फिर्यादी व मयत हे डाव्या बाजुला जात असल्याचे नमुद केले आहे. तरी सुध्दा वाहन चालकाने रस्त्यावर वाहन चालविताना योग्य ती काळजी घ्यायला हवी. त्यामुळे एकंदरीतच फिर्यादीच्या पुराव्यावरुन मयतास पाठीमागुन येवून चालकाने धडक दिली. परंतु, सदरची धडक ही निष्काळजीपणे व हयगयीपणे दिली का या बाबत साक्षंकता निर्माण होते. तसेच फिर्यादीने सदरच्या वाहण चालकास पाहील्यास ओळखू शकतो असे कथन केले आहे. परंतु, आरोपी हेच कंटेनर चालवित होते. याबाबतीत स्पष्ट उल्लेख केला नाही. त्यामुळे चालकाबाबत साक्षंकता निर्माण होते.

**१०.** साक्षीदार क्र.०२ व ०३ हे मयताचे नातेवाई असुन ते फोन केल्यानंतर घटणास्थळावरती आले. त्यांनी त्याच्या उलट तपासात घटणा प्रत्यक्षदर्शी पाहिले नसल्याचे कथन केले आहे. सदरच्या साक्षीदार हे ऐकावे माहितीच्या आधारावरती वरील साक्ष दिली आहे. त्यामुळे त्यांची साक्षी सरकारी पक्षास तसेच फिर्यादीच्या कथनास दुजोरा देणारी ठरत नाही.

**११.** फिर्यादीने त्याच्या पुराव्यामध्ये प्रत्यक्ष वाहन चालक हे धडक दिल्यावरती थांबले नाही व त्या बाबतीत पळुन गेले या बाबतीत उहापोह केला नाही. तसेच तपास अधिकारी न तपासल्यामुळे सदरच्या कंटेनर हा धडक दिल्यानंतर घटणास्थळावर थांबले नाही. चालकाने पोलीस स्टेशनला जाऊन त्याने माहिती दिली नाही ही बाबी सिध्द झाल्या नाही.

**१२.** एकंदरीतच वर न्यायालया समक्ष आलेल्या पुराव्यावरुन आरेपी त्यांच्या पुराव्यातून वाहन हे निष्काळजीपणे व हयगयीपणे मयताच्या मृत्यूस कारणीभूत झाले हे सरकारी पक्षास वाजवी साक्षंकतेच्या पलीकडे जाऊन सिध्द केले

नाही.

**२०.** एकंदरीत सरकार पक्षातर्फे नोंदविण्यात आलेला साक्षीपुरावा भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३०४(अ) तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४/१७७ या आरोपांचे मूलभूत घटक आरोपीविरुध्द दर्शविण्यासाठी ठोस आणि सबळ पुरावा आहे असे म्हणता येणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन विचाराधीन प्रश्न क्र.०१ ते ०३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.०४ करीता</u> –**

**२१.** फिर्यादी व साक्षीदार यांचा पुरावा अभियोगपक्षाला आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्यास उपयुक्त ठरत नाही. सदर आरोपीविरुध्द इतर कोणताही अपराध सिध्द होत नाही. आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा वाजवी साक्षंकतेच्या पलीकडे जावून शाबीत न झाल्याने ते निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. सबब, विचाराधीन प्रश्न क्र.०४ बाबत मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** आरोपी क्र.**१ दशरथ भाऊसाहेब सुरनर,** यांना भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३०४(अ) तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४/१७७ अन्वये ठेवलेल्या दोषारोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २४८ (१) अन्वये **<u>निर्दोष सोडण्यात येते.</u>**

**२.** आरोपीचे पूर्वीची बंधपत्रे व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

**३.** सदर खटल्यात जप्त करण्यात आलेला कंटेनर एम.एच.१२ एन. एक्स.३३५० यापूर्वीच त्याचा ताबा सुपूर्दनाम्यावरती बाबुराव भगवान चाळक यांच्याकडे दिलेला आहे. तो त्यांच्याकडे कायम ठेवण्यात येतो.

**४.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये रक्कम

रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र सादर करावे. सदर जामीन बंधपत्रे आजपासून सहा महिन्यांपर्यंत (अपील कालावधी संपेपर्यंत) अस्तित्वात राहतील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

स्वाक्षरीत /-
**(निरंजन बा. चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोहा
न्यायालय क्र.२

लोहा.
दिनांक :०५/०६/२०२६

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per the original judgment -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V.N.Devare, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,Loha |
| Date | : | 05/06/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 05/06/2026 |
| Order uploaded on | : | 05/06/2026 |